मिनल गावडे, चिंचपोकळी.

□ नीलम आणि गोविंदा यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केलीय? नीलमने *हम साथ साथ* हैनंतर चित्रपटसंन्यास घेतलाय का?

— *इल्जाम, लव्ह ८६, खुदगर्ज, सिंदूर, घर में राम गली में श्याम, हत्या, बिल्लू बादशहा, दो कैदी, दोस्त गरीबोंका, ताकतवर, घराना, जोरदार* या चित्रपटात गोविंदा व नीलम ही जोडी एकत्र आली. नवनव्या चित्रतारकांच्या स्पर्धेत नीलमची पिछेहाट झाली. यामुळे ती पडद्याआड गेली.

□ चिरंजीवी नावाचा अभिनेता मूळचा कुठला आहे? त्याने किती हिंदी चित्रपटात भूमिका केल्या आहेत?

— तो मूळचा दक्षिणेचा आहे. *द जंगलमन, प्रतिबंध*सारख्या एक-दोन हिंदी चित्रपटातच तो चमकला आहे.

विश्वनाथ रावराणे, वैभववाडी.

□ 'राजा की आयेगी बारात...' हे गाणं कोणत्या चित्रपटातलं आहे? गीतकार, संगीतकार, गायक कोण? हे गाणं कोणावर चित्रित करण्यात आलं?

— १९५३च्या *आह*मध्ये हे गाणं होतं. गीतकार शैलेंद्र, संगीतकार शंकर-जयकिशन, गायिका लता हे गाणं नरगीसवर चित्रित करण्यात आलं होतं.

सुहासिनी भालेकर, डोंबिवली.

□ कुमार गंधर्व यांनी कधी चित्रपटासाठी पार्श्वगायन केलं होतं? त्यांची नावं काय? ते किती साली प्रदर्शित झाले?

– झाकोळमध्ये कुमार गंधर्व पडद्यावर दिसले होते आणि पडद्यावरच्या या दिसण्यातच या चित्रपटात एक गाणं त्यांनी गायलं होतं. त्यांच्याबरोबरच गायिका शोभा गुर्टू या चित्रपटात गाताना पडद्यावर दिसली होती.

□ विनोद खन्नाने चित्रपट निर्मिती सुरू केलीय का?

— नियमितपणे नाही. आपला मुलगा अक्षय खन्ना याला नायक बनवण्यासाठी १९९७ला त्याने हिमालयपुत्र हा चित्रपट निर्माण केला होता.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ बेबी तब्बस्सुम कोणकोणत्या चित्रपटात बालतारका होती?

— *नरगीस, मजधार, मेरा सुहाग, लखपती, बडी बहन, छोटी भाभी, जोगन, राज मुकूट, सरगम, संग्राम, आराम, अफसाना, बहार, दीदार, गुमास्ता, काले बादल, बैजू बावरा, मोती महल, राजरानी दमयंती, शिन शिना की, बुबलाबू, बाप बेटी* या चित्रपटात.

□ *बचपन* या चित्रपटातील नायक-नायिका व बालकलाकार कोण?

— *बचपन* या नावाचे तीन चित्रपट आतापर्यंत आलेत. १९४५ला पहिला *बचपन* आला होता. वी.नांद्रेकर व चंद्रप्रभा या चित्रपटातील नायक-नायिका होते व बालकलाकार बेबी माधुरी (मीनाकुमारीची बहीण व मेहमूदची भूतपूर्वपत्नी), बेबी शकुंतला व शशी कपूर (राज व शम्मी कपूरचा भाऊ नव्हे त्या काळात शशी कपूर या नावाचा एक अन्य बालकलाकार चित्रपटात होता.) १९६३ला दुसरा बचपन आला होता, या चित्रपटात सलमान खानचे वडील, सलीम-जावेद या लेखनद्वयीपैकी सलीम नायक होते व नायिका डेझी व हनी ईराणी या बालतारकांची बहीण मेनका ईराणी, डेझी ईराणी या चित्रपटातील बालतारका होती. १९७०ला तिसरा बचपन आला होता. संजीवकुमार व तनुजा या चित्रपटातील नायक-नायिका होते आणि बालकलाकार सचिन, मेहमूद (ज्यू) व मा.शाहीद.

विनायक राजाराम चांदिवाले, कोल्हापूर.

□ लता मंगेशकर यांनी कोणत्या टोपणनावाने संगीत दिग्दर्शन केलं? त्यांनी कोणत्या चित्रपटांना संगीत दिलं होतं?

— आनंदघन या नावाने लताबाईंनी संगीतदिग्दर्शन केलं. *मोहित्यांची मंजुळा, मराठा तितका मेळवावा, साधी माणसं, तांबडी माती* या चित्रपटांना त्यांनी या टोपणनावाने संगीत दिलं तर १९५० मध्ये *राम राम पाव्हणं* या चित्रपटाला लता मंगेशकर याच नावाने संगीत दिलं होतं.

□ मेहमूदचा पहिला चित्रपट कोणता? निर्माता म्हणून त्याचा पहिला चित्रपट कोणता?

— बॉम्बे टॉकीजचा *किस्मत* हा मेहमूदचा बालकलाकार म्हणून पहिला चित्रपट होता. यात त्याने अशोककुमारच्या बालपणीची भूमिका साकारली होती. त्याला हास्य अभिनेता म्हणून प्रकाशात आणणारा पहिला चित्रपट १९५८ चा *परवरीश.* १९६१ साली *छोटे नवाब* हा चित्रपट त्याच्या निर्मितीतला पहिला चित्रपट होय.

उमेश सदाशीव महिपतकर, ओसर.

□ संजना कपूर ही कोणाची मुलगी आहे? तिने आजवर कोणत्या चित्रपटांत भूमिका केल्या आहेत? सध्या ती काय करतेय?

— संजना कपूर ही अभिनेता शशी कपूर यांची मुलगी. तिने *हिरो हिरालाल*सारख्या एक-दोन चित्रपटांत अभिनय केला. पण तिला फारसं यश आलं नाही. सध्या संजना आपल्या घरच्या पृथ्वी थिएटर्सचं काम सांभाळते.

□ *अबोली* नावाचा चित्रपट किती साली प्रदर्शित झाला? त्याचे कलाकार कोण होते?

— *अबोली* या नावाचे दोन मराठी चित्रपट आजवर प्रदर्शित झाले आहेत. यातला १९५३ साली पहिला चित्रपट प्रदर्शित झाला. दत्ता धर्माधिकारी त्याचे निर्माता होते. दिग्दर्शक अनंत माने आणि नायक विवेक तर नायिका बेबी शकुंतला हे होते. १९९५ मध्ये दुसरा *अबोली* प्रदर्शित झाला. अमोल शेडगे त्याचे निर्माता होते आणि दिग्दर्शक होते तर दुसरे निर्माता निशिकांत सदाफुले संगीतकार होते. प्रमुख कलाकारांत सयाजी शिंदे, रेणुका शहाणे आणि वर्षा उसगावकर ही नावं सांगता येतील.

कृष्णाजी विठोबा साळवी, ओझर

□ रमेश देव आणि सीमा यांनी आतापर्यंत कोणकोणत्या चित्रपटांत एकत्र भूमिका केल्या?



या सुखांनो यामध्ये रमेशदेव - सीमा.

— *आलिया भोगासी, ग्यानबा तुकाराम, यंदा कर्तव्य आहे, एक धागा सुखाचा, माझी आई, सुवासिनी, चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे, सोनियाची पाऊले, मोलकरीण, ते माझे घर, वैभव, पडछाया, शोधा म्हणजे सापडेल, जुनं ते सोनं, अपराध, काळी बायको, ओवाळीते भाऊराया, या सुखांनो या, बदला, सर्जा* या मराठी आणि *दस लाख, आनंद, सरस्वती चंद्रा* या हिंदी चित्रपटांत रमेश आणि सीमाने एकत्र काम केलं. यातल्या *सर्जा*मध्ये त्यांचा मुलगा अजिंक्य नायक होता.